**KIRAN TUTORIALS** **Seat No.** ☐☐☐☐☐☐☐

**Std 10 (English)** **Marathi**

| Time 1HRS | Chapter | Marks 25 |
|---|---|---|

**Q.1 पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :** **7**

1 **A1)** i) आकृती पूर्ण करा 1

☐ { आपण विसरलेल्या गोष्टी } ☐

ii) चौकटी पूर्ण करा 1

i. भाजी आणण्यासाठी आपण हे वाहन वापरतो - ☐

ii. बसनेप्रवास करणे असे वाटते - ☐

> "मी ठरवलंय, मी कॉलेजला जाताना सायकल वापरणार. मला माझे पाय रेखामावशीं सारखे चंदेरी हवेत,"
>
> अभिषेक एकदम भारावून गेला होता. "माझ्यातर कॉलेज समोरच बसस्टॉप आहे. आजपासून मी बसनंच ये - जा करणार. ठरलं एकदम!" स्नेहलनं निश्चयच केला.
>
> "खरंय पोरांनो, आजकाल चालणं, सायकल वापरणं विसरूनच गेलोय आपण. अगदी कोपऱ्यावरून भाजी जरी आणायची असली तरी आपण बाईकला किक मारतो आणि पुन्हा व्यायामाकरता वेगळं मॉर्निंग वॉकचं नाटक करतो," "बसनं प्रवास करणं तर आपल्याला कमीपणाचं वाटतं; पण आपल्या पायांना चिकटलेला कार्बन प्रमाणात ठेवण्याकरता पब्लिक ट्रान्सपोर्ट इज मस्ट,"
>
> रेखामावशी सगळ्यांचं बोलणं लक्ष देऊन ऐकत होत्या. बोलता बोलता हलकेच त्यांनी आपल्या पायाचे फरशीवरचे ठसे ओल्या फडक्याने पुसून घेतले.
>
> "पाह्यलंत, किती सहजपणे पुसले आपल्या मळलेल्या पायांचे ठसे रेखामावशींनी," सुमित म्हणाला.
>
> "पण आपल्या पायांचे वातावरणावर उमटलेले ठसे मात्र, आपल्याला इतक्या सहजतेने नाही बरं पुसता येणार. त्याकरता आपल्याला झाडं लावावी लागतील... या हिरव्यागर्द झाडांनी आपली काळीकुट्ट पावलं थोडी तरी उजळ होतील," सुमित भरभरून बोलत होता. "हो ना, नाही तर आपण तसेच धावत राहू. मळलेल्या पायांची माणसं बनून!" पावडेकाका बोलले आणि त्या निळ्याशार तुकड्यावर चांदणं उमलल्याचा त्यांना भास झाला.

**A2)** i) एका शब्दात उत्तरे लिहा. 1

i. व्यायामासाठी आपण याच नाटक करतो. - ☐

ii. अभिषेकने केलेला निश्चय - ☐

ii) सत्य की असत्य ते लिहा. 1

i. रेखामावशींची पावले चंदेरी आहेत.

ii. स्नेहल सायकलने कॉलेजला जाणार आहे.

**A3)** स्वमत 3

'तापाने फणफणलीय आपली धरती' ही स्थिती बदलण्यासाठी उपाय सूचवा.

**Q.2 पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** **8**

1 **A1)** आकृती पूर्ण करा 2

1) { योगी पुरूषाच्या जन्मामुळे हे होते. }

☐ ☐

2) आकाशातून इहलोकात खाली येणारे

↓ ☐ ↓ ☐

> जेवीं चंद्रकिरण चकोरांसी | पांखोवा जेवीं पिलियांसी |

KIRAN TUTORIALS

जीवन जैसे कां जीवांसी | तेवीं सर्वांसी मृदुत्व ||
जळ वरिवरी क्षाळी मळ | योगिया सबाह्य करी निर्मळ |
उदक सुखी करी एक वेळ | योगी सर्वकाळ सुखदाता ||
उदकाचें सुख तें किती | सवेंचि क्षणें तृषितें होती |
योगिया दे स्वानंदतृप्ती | सुखासी विकृती पैं नाही ||
उदकाची जे मधुरता | ते रसनेसीचि तत्त्वतां |
योगियांचे गोडपण पाहतां | होय निवविता सर्वेंद्रियां ||
मेघमुखें अध:पतन | उदकाचें देखोनि जाण |
अध:पातें निवती जन | अन्नदान सकळांसी ||
तैसे योगियासी खालुतें येणें | जे इहलोकीं जन्म पावणें |
जन निववी श्रवणकीर्तनें | निजज्ञानें उद्धरी ||

**A2)** घटनेनुसार वाक्यांचा क्रम लावा 2

i. अन्नदान सकळांसी.
ii. जे इहलोकी जन्म पावणें.
iii. सुखासी विकृती पैं नाही.
iv. योगी सर्वकाळ सुखदाता.

**A3)** प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा. 2

i. पाखोवा -
ii. जीवन, उदक, जल -
iii. जीव -
iv. मृदुत्व -

**A4)** स्वमत 2

योगी पुरूष आणि पाणी हे दोघेही सामाजिक कार्य करतात, हे स्पष्ट करा.

**Q.3 पुढीलपैकी कृती सोडवा : (स्थूलवाचन)** 3

1 पणतीच्या उदाहरणातून कवितेत व्यक्त झालेला विचार स्पष्ट करा.

**Q.4 पुढील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** 1

1 i. संकल्प - ..............
ii. जीभ - ..............

**Q.5 कथालेखन(Any One)** 6

1 **खालील मुद्द्यावरून कथा लिहा.**

**मुद्दे –**
एक सैनिक – शत्रूकडून कैद – तुरुंगात हाल सहन करणे – सुटका – रस्त्यात पोपट विकणारा – पोपटांचे सर्व पिंजरे खरेदी करणे – पोपटांना सोडून देणे – स्वातंत्र्याचेमहत्त्व – तात्पर्य.

2 **खालील अपूर्ण कथा वाचा, तुमचा विचार व कल्पकतेने ती कथा पूर्ण करा.**
**(दिलेली अपूर्ण कथा लिहून घेण्याची आवश्यकता नाही.)**

रोझी मन लावून अभ्यास करत होती. सभोवती सगळा वह्या -पुस्तकांचा पसारा होता. अभ्यास करता-करता तिचे लक्ष तिच्या आवडत्या फिकट निळ्या रंगाच्या वहीकडे गेले. वहीच्या पानातून मोरपिसाचे टोक डोकावत होते. तिने हातातले अभ्यासाचे पुस्तक मिटवले आणि ..............

KIRAN TUTORIALS